# सुचना
## दिनांक : २५/०८/२०२२

<u>विषय : कंत्राटी स्टाफ नर्स सेवेच्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांबाबत.</u>

**संदर्भ** : १. दैनिक लोकमत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात दि.११/०१/२०२२.
२. स्टाफ नर्स सेवेची कौशल्य चाचणी दि.२१/०६/२०२२, दि.२२/०६/२०२२.
३. स्टाफ नर्स सेवेची समुदपेदशन प्रक्रिया दि.०६/०७/२०२२.
४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांची टिप्पणी दि.०१/०८/२०२२.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत कंत्राटी स्टाफ नर्स उमेदवारांची समुपदेशन प्रक्रिया दि.०६/०७/२०२२ रोजी उपसंचालक आरोग्य सेवा, बाबा पेट्रोल पंपासमोर, औरंगाबाद येथे आयोजित केली होती.

प्राप्त निवड निकषाच्या गुणांनुसार उमेदवारांना समुपदेशानामध्ये संधी देवून उमेदवारांनी त्यांच्या आवडीनुसार प्रा आ केंद्र ठिकाणी पदस्थापना प्राप्त केली. खुल्या प्रवर्गातील उमेदवार ज्योती सुरेश देवरे आणि भाग्यश्री ज्ञानेश्वर सोनवणे यांनी समुदपदेशनात प्रा आ केंद्र पानवडोद, ता.सिल्लोड, प्राप्त केले. परंतु दोन्ही उमेदवार पानवडोद ठिकाणी काम करण्यास इच्छूक नसल्याने त्यांनी स्टाफ नर्स सेवेसाठी नकार दिला असून पुढील उमेदवारांना संधी देण्यास हरकत नसल्याचे या कार्यालयास कळविले असल्याने उपरोक्त प्रा आ केंद्र ठिकाणी स्टाफ नर्स सेवा रिक्त झाली आहे.

या अनुषंगाने खुल्या प्रवर्गामध्ये प्रतिक्षा यादीत असलेले स्टाफ नर्स सेवेचे उमेदवार अनुक्रमे १.सुकेशिनी प्रकाश साळवे, २.माधुरी रविकुमार नवगिरे, ३.संजीत सुनित बत्तीसे, ४.वैशाली एकनाथ वाहुळ यांचे समुपदेशन दि.३०/०८/२०२२ (मंगळवार) रोजी सकाळी १० वाजता उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालय, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद येथे आयोजित केले असुन संबंधीतानी आवश्यक मुळ शैक्षणिक कागदपत्र, छायांकित प्रतीसह प्रत्यक्ष वेळेवर कार्यालयात उपस्थित राहावे.

समुपदेशानास उपस्थित न राहिल्यास आपण सदर सेवेसाठी इच्छुक नाही असे गृहीत धरुन आपणास पुनश्चः स्टाफ नर्स सेवे करीता संधी देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद**